सकाळ, पान १०, २१.४.१६

# भारताला बराच पल्ला गाठायचाय!

## रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांचे पुण्यात प्रतिपादन

**पुणे, ता. २०** : जगात सर्वांत वेगाने प्रगती करीत असलेली अर्थव्यवस्था म्हणून भारताचा सर्वत्र उल्लेख केला जात असला तरी त्यामुळे हुरळून जाता कामा नये, कारण भारत हा अजूनही गरीब देशांमध्येच गणला जातो. ही बाब लक्षात घेता, आपल्याला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांनी आज येथे केले.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंटमध्ये (एनआयबीएम) आज झालेल्या पदवीप्रदान सोहळ्यात ते बोलत होते. बँक्स बोर्ड ब्युरोचे अध्यक्ष विनोद राय, 'एनआयबीएम'चे संचालक डॉ. अचिंतन भट्टाचार्य हेही या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसमोर बोलताना श्री. राजन म्हणाले, ''दरडोई उत्पन्नाच्या आघाडीवर भारत हा 'ब्रिक्स' देशांमध्ये अजूनही सर्वाधिक गरीब देश म्हणूनच गणला जातो. सरकारने केलेल्या अविरत प्रयत्नांचे प्रतिबिंब देशाच्या सध्याच्या प्रगतीत नक्कीच दिसून येत आहे; परंतु यामुळे हुरळून जाता कामा नये. आपल्या देशातील नागरिकांचे जीवनमान एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी अशाच प्रगतिशील कामगिरीची पुनरावृत्ती पुढील २० वर्षे करावी लागेल.''




**पुणे : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंटमध्ये (एनआयबीएम) बुधवारी झालेल्या पदवीप्रदान सोहळ्यात बोलताना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन. बँक्स बोर्ड ब्युरोचे अध्यक्ष विनोद राय, 'एनआयबीएम'चे संचालक डॉ. अचिंतन भट्टाचार्य आदी मान्यवरही या वेळी उपस्थित होते.**

भारत व चीन यांच्यात सातत्याने होणाऱ्या तुलनेचा संदर्भ देताना ते म्हणाले, की चीनमधील सर्वसाधारण नागरिक हा सर्वसाधारण भारतीयाच्या चौपट श्रीमंत आहे. १९६० च्या दशकात चीनची अर्थव्यवस्था ही भारतापेक्षा छोटी किंवा लहान होती; पण आज ती आपल्यापेक्षा पाचपट मोठी झाली आहे.

**'माझ्या वक्तव्याचा विपर्यास'**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीविषयी प्रतिक्रिया देताना राजन यांनी अलीकडेच, भारताला 'अंधांच्या राज्यातील एक डोळ्याचा राजा', असे संबोधले होते. परंतु आपल्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ''माझ्या वक्तव्यामुळे ज्यांच्या भावना दुखावल्या असतील, अशा अंध व्यक्तींची मी माफी मागतो. भारताला एक डोळ्याचा राजा म्हणण्यामागे माझा हेतू होता, की सध्याच्या जागतिक परिस्थितीत अन्य देशांची फारशी प्रगती होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर भारताची उत्तम कामगिरी अधिक प्रमाणात अधोरेखित होत आहे, इतकेच.'' केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली आणि केंद्रीय वाणिज्यमंत्री निर्मला सीतारामन यांनी राजन यांच्या वक्तव्यावर काहीसा आक्षेप घेतला होता.